लोकमत

# एका शाळेचा अभिनव दृष्टिकोन

**शा**ळेत मुलांनी काय शिकावे? कसे शिकावे? आणि का शिकावे? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरेही शाळा व्यवस्थापनाला माहीत असणे खूप गरजेचे असते. त्यासोबतच एकविसाव्या शतकाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये कोणती कौशल्ये रुजायला हवीत, या विचाराने शाळाशाळांमधील वर्गावर्गात मुलांच्या विचारप्रक्रियेला चालना देणाऱ्या अनुभवांची मांडणी होणे गरजेचे आहे. अशावेळी केवळ अभ्यासक्रम किंवा पाठ्यक्रम संपवून परीक्षांची कृत्रिम उभारणीने हे शक्य होणार नाही. हे लक्षात घेऊन डोंबिवली शहराच्या पूर्वेला डावलपाडा या खेडेगावाच्या शिवारात अजित करकरे आणि गौरी करकरे या दाम्पत्याने 'गुरुकुल द डे-स्कूल' या शाळेची उभारणी केली आहे. अभ्यास, परीक्षा, क्रमांक आणि जीवघेणी स्पर्धा या पलीकडे जाऊन मुलांच्या वैयक्तिक-सामाजिक विकासाकरिता ही शाळा धडपडताना दिसून येत आहे.

## गृहपाठ

● संतोष सोनावणे

म. गांधी यांच्या जयंतीनिमित्त मुंबई प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या ज्येष्ठ अधिव्याख्यात्या मनीषा पवार यांच्या गटाने डोंबिवली पूर्वेतील या शाळेला भेट दिली. एकूणच शाळेची कार्यप्रणाली, व्यवस्थापन आणि मुलांच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने शाळा घेत असलेली मेहनत जवळून पाहण्याचा या भेटीमागील खरा हेतू होता. शाळेचे संस्थाचालक व शिक्षक अशी दुहेरी भूमिका यशस्वीपणे सांभाळणारे ओमकार करकरे यांनी विस्तृतपणे शाळेविषयी प्रत्यक्ष सादरीकरण करुन शाळेची भूमिका व कार्य स्पष्ट केले. मनीषा पवार यांच्यासोबत टीममध्ये निंबाजी गीते, संतोष सोनवणे, प्रवीण पाटील, हर्षा चव्हाण हे प्राधिकरणाचे सदस्यदेखील उपस्थित होते.

शाळा म्हणजे काय? याबाबत आपल्या मनात शाळेविषयी एक संकल्पना किंवा चित्र निर्माण झालेले असते. बहुतांश ठिकाणी एका पारंपरिक साच्यातील शाळा, शाळेची इमारत दिसते व तेथील एकूणच कार्यप्रणाली दिसून येते. अर्थात, त्यातही काही शिक्षक, शाळा या आपली मळलेली वाट सोडून मुलांसाठी नावीन्य शोधण्याचा आणि ते राबवण्याचा कसोशीने प्रयत्न करताना दिसून येतात.

मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत या शाळेत मात्र इतर शाळांप्रमाणे अति प्रभावाखाली काम होताना दिसून येत नाही. कारण, अभ्यासक्रम या नियोजनातील बाबी आहेत, त्या होतच राहणार. मात्र, ही मुले ज्या कुटुंबातून आली आहेत, ज्या समाजातून आली आहेत, त्या कुटुंबाचा, समाजाचा ती पुढे आधार होणार आहेत. याचा विचार करुन शाळेची काय भूमिका असावी, यावर ही शाळा काम करतेय. त्यासोबतच विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सामाजिक व्यक्तिमत्त्व विकासाकरिता आम्ही बांधील आहोत, असेही करकरे सांगतात.

याकरिता या शाळेत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त काही महत्त्वपूर्ण विद्यार्थी विकास उपक्रमांची आखणी केल्याचे दिसून येत आहे.

santosh.sonawane2@gmail.com



**विद्यार्थ्यांच्या विकासाच्या अनुषंगाने या शाळेत पुढील उपक्रमांवर काम केले जाते :**

१. अवांतर पुस्तकांचे वाचन (Liabray Reading )
२. दैनंदिनी लेखन (Dairy Writing)
३. मासिक प्रकल्प (Spectrum)
४. एखाद्या विषयावर आपले भाष्य/मनोगत व्यक्त करणे (Talk on Topic)
५. वार्षिक प्रकल्प (Mega Project)

## चार प्रमुख उपक्रमांवर केले जाणारे सविस्तर काम :

### १. अवांतर पुस्तकांचे वाचन (Liabray Reading )-

शाळेत मुलांकरिता सुसज्ज असे वाचनालय आहे. तेथे मुलांच्या वयानुरुप भारतीय व परदेशी साहित्याचा समावेश आहे. अशी पुस्तके मुलांना उपलब्ध करून दिली जातात की, ज्याद्वारे मुले आपल्या या वाचनातून विश्लेषणात्मक विचार करू शकतील. इयत्ता दुसरीपासून प्रत्येक विद्यार्थी इथे या वाचनालयातून पुस्तक घेत असतो. मुलांच्या वर्षभरात वाचलेल्या पुस्तकांच्या संख्यांच्या तसेच पुस्तक प्रकारच्या नोंदी या आश्चर्यचकित करणाऱ्या आहेत.

### २. दैनंदिनी लेखन (Dairy Writing) -

या शाळेतील इयत्ता तिसरीपासूनची मुले ही नियमितपणे दैनंदिनी लिहिताना दिसून येत आहेत. आपल्या दैनंदिन घडामोडीचे आपल्या शब्दातील मुलांचे लेखन खूपच विचार करणारे असे दिसून आले आहे. लहान मुले एखाद्या घटनेचा कशाप्रकारे विचार करु शकतात आणि ते मांडू शकतात हे आपणा मोठ्यांना खूप विचार करायला लावणारे आहे. असे अनुभव या दैनंदिनी लेखनाच्या नमुन्यातून दिसून येत आहे.

### ३. मासिक प्रकल्प (Spectrum)-

हा उपक्रम पाचवीपासून असतो. ज्यात प्रत्येक मुलाला एक विषय प्रत्येक महिन्याकरिता दिला जातो, जो वेगवेगळा असतो. ज्या माध्यमातून मुलाने त्या विषयाची माहिती मिळवणे, त्याचे संदर्भीय आधार शोधणे, त्याची मांडणी करणे आणि ते सादर करणे अपेक्षित आहे. याद्वारे मुले स्वत: संशोधक वृत्तीने एखाद्या विषयाकडे पाहतात आणि त्याद्वारे त्याची मांडणी करून आपल्या सहकारी वर्ग मित्रांसमोर मांडतात.

### ४. एखाद्या विषयावर मनोगत मांडणे (Talk on Topic) -

प्रत्येक मुलाने आठवड्याला आवडत्या विषयावर किंवा दिलेल्या विषयावर वर्गात काही मिनिटे व्यक्त होणे हे यात अपेक्षित असते. इयत्ता तिसरीपासून हा उपक्रम घेतला जातो. ज्याद्वारे मुले आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटना प्रसंगांचे यात वर्णन करतात. सभाधीटपणा तसेच अभिव्यक्त होण्याची संधी व सवय लागणे हा यामागील हेतू दिसून येतो.